# 'गडचिरोली जिल्ह्यातील ग्रामीण समाजातील महिला सक्षमीकरणाची एक सद्य:स्थिती : एक समाजशास्त्रीय अध्ययन'

## (विशेष संदर्भ : आरमोरी तालुका)

Dr.Gajendra M. Kadhav
Head, Department of Sociology
M.G. College, Armori, Dist. Gadchiroli,(MH)

**सारांश** :भारतीय समाज प्रामुख्याने दोन भागात विभागलेला आहे, एक शहरी समाज आणि दुसरा ग्रामीण समाज. शहरी समाजात कृत्रिमता दिसते तर ग्रामीण समाजात नैसर्गिक जीवन दिसते. पूर्वी भारतीय समाजात संयुक्त कुटुंब पद्धती होती. या कुटुंबामध्ये स्त्रियांना दुय्यम स्थान होते, पण आज ग्रामीण समाजात संयुक्त कुटुंब पद्धतीचे विघटन होऊन त्याची जागा विभक्त कुटुंबाने घेतली आहे. त्यामुळे आज ग्रामीण समाजात विविध बदल होत आहेत. त्याचप्रमाणे महिलांच्या स्थितीमध्ये देखील परिवर्तन होत असतांना दिसून येत आहे. पूर्वी स्त्रियांना कुटुंबातील कोणत्याच निर्णयप्रक्रियेत भाग घेऊ दिल्या जात नव्हते. परंतु आज मात्र ग्रामीण भागातील काही महिला कुटुंबातील निर्णयप्रक्रियेत सहभाग घेत असल्याचे दिसून येते. तसेच कुटुंबातील अनेक महत्वाचे निर्णय महिला स्वतः घेत आहे. परंतु ग्रामीण समाजातील अनेक स्त्रिया कुटुंबातील निर्णय स्वतः घेत नाही तर त्या पुरुष वर्गांवर अवलंबून असतात. म्हणूनच आज स्त्री सक्षमीकरणाची आवशक्यता निर्माण झाली आहे.स्त्रीसक्षमीकरणाची संकल्पना सर्वप्रथम संयुक्त राष्ट्र संघटनेने १९७५ साली केली, भारताने देखील राष्ट्रबांधणीत स्त्रियांचे महत्व लक्षात घेऊन २००१ हे वर्ष महिला सक्षमीकरण वर्ष म्हणून जाहीर केले. प्रस्तुत संशोधन अध्ययनात गडचिरोली जिल्ह्यातील महिलांमध्ये सक्षमीकरणाची गतिशीलता किती प्रमाणात आहे याविषयी माहिती जाणून घेण्याच्या प्रयत्न संशोधनकर्त्याने केलेला आहे.

**की-वर्ड** : गतिशीलता, सक्षमीकरण, नैसर्गिक, संयुक्त कुटुंबपद्धती, विभक्त कुटुंबपद्धती, सामाजिक परिवर्तन, सध्य:स्थिती

**प्रस्तावना** :कोणत्याही समाजाचे सम्यक आकलन होण्यासाठी त्या समाजातील स्त्रियांच्या दर्जा कसा आहे हे लक्षात घेणे आवश्यक असते त्याशिवाय त्या समाजाचे संपूर्ण आकलन करता येत नाही.स्त्री आणि पुरुष हे निसर्गाने निर्माण केलेले दोन मानव आहेत. दोघांनीही एकमेकांसोबत राहावं, दोघांनीही एकमेकांना पूरक असावं आणि सामाजिक जाणिवेचा प्रवाह कायम राहावा, हे निसर्गाचं लक्षण आहे. पण पुरुषप्रधान कुटुंबपद्धती, परकीय लोकांचे आक्रमण, स्त्रिया आर्थिकदृष्ट्या पुरुषांवर अवलंबून राहणे, मातृत्पण इ. कारणांमुळे स्त्रियांना समाजात पुरुषांच्या तुलनेत दुय्यम स्थान मिळत गेले. समाजात स्त्रियांचे प्रमाण निम्मे असले तरी समाजामध्ये, कुटुंबामध्ये तिला बालपणापासूनच भेदभावाला सामोरे जावे लागते. भारतामध्ये प्रत्येकच राज्यामध्ये पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांच्या शिक्षणाचे प्रमाण कमी असल्याचे दिसून येते. २०११ च्या जनगणनेनुसार भारतामध्ये ८०.८८ टक्के पुरुष साक्षर आहे तर ६४.६३ टक्के स्त्रिया साक्षर असल्याचे दिसून येते. महाराष्ट्र राज्यात ८८.०४ टक्के पुरुष तर ७५.०९ स्त्रिया साक्षर असल्याचे दिसून येते. तसेच देशातील लिंग गुन्नोत्तराचा विचार केल्यास भारतात १००० पुरुषांमागे ९४३ स्त्रिया आहेत तर महाराष्ट्रासारख्या पुरोगामी समजल्या जाणाऱ्या राज्यात १००० पुरुषांमागे फक्त ९२९ स्त्रिया आहे. वरील आकडेवारीवरून भारतामध्ये देश आणि राज्य पातळीवर स्त्रियांचे शिक्षणाचे आणि लोकसंख्येचे प्रमाण किती कमी आहे ते दिसून येते. ताराबाई शिंदे यांनी १८८२ साली लिहिलेल्या 'स्त्री-पुरुष तुलना' या पुस्तकात 'स्त्रीयांशिवाय पुरुषांच्या जीवनाला शोभा येत नाही' असे म्हटले आहे. स्वामी विवेकानंद यांनी देखील 'स्त्रियांच्या सहकार्याशिवाय जगाची प्रगती होऊ शकत नाही' असे विधान केले आहे. २१ व्या

शतकात मानव नवनवीन वैज्ञानिक शोध लावून प्रगतीच्या शिकरावरपोहचत असला तरी त्याला स्त्री-पुरुष समानतेचा प्रश्न सोडविता आला नाही. म्हणूनच आज देशाचा, समाजाचा विकास करतांना महिलांच्या जास्तीत जास्त सहभाग वाढवून त्यांना सबला करून सक्षम बनविणे आवश्यक आहे.

**स्त्री सक्षमीकरणाचा अर्थ :**स्त्री सक्षमीकरण म्हणजे स्त्रियांना निर्णयाच्या बाबतीत स्वावलंबी, सक्षम बनविणे होय, असा साधा अर्थ स्त्री सक्षमीकरणाचा आहे. ऑक्सफर्ड शब्दकोशामध्ये स्त्री सक्षमीकरण म्हणजे 'स्त्रियांना नैसर्गिक, वैधानिक आणि नैतिक हक्क प्रदान करणे होय'. किरण देवेंद्र यांच्या मते 'स्त्री सक्षमीकरण म्हणजे स्त्रियांना आर्थिकदृष्ट्या सक्षम, स्वतंत्र्य आणि आत्मनिर्भर बनविणे होय'

वरील सर्व व्याख्यांवरून असे निदर्शनात येते की, स्त्री सक्षमीकरण ही एक सक्रीय अशी एक प्रकिया आहे, ज्यात सर्वच क्षेत्रातील स्त्रियांना चूल आणि मुल या पारंपारिक चक्राचा बाहेर काढून स्त्री एक माणूस आहे म्हणून तिला विकसित होण्यासाठी समान संधी उपलब्ध करून देणे, तिला सामाजिक, कौटुंबिक, आर्थिक, शैक्षणिक आणि राजकीयदृष्ट्या निर्णय घेण्यासाठी सक्षम बनविणे होय. स्त्री सक्षमीकरणाची संकल्पना सर्वप्रथम संयुक्त राष्ट्र संघटनेने १९७५ साली केली, भारताने देखील राष्ट्रबांधणीत स्त्रियांचे महत्व लक्षात घेऊन २००१ हे वर्ष महिला सक्षमीकरण वर्ष म्हणून जाहीर केले.२००१ या वर्षात संपूर्ण भारतामध्ये व्याख्यान, चर्चासत्र, कार्यशाळा, योजना राबवून महिला सक्षमीकरणावर भर देण्यात आला.

**संशोधन पद्धती :** सदर संशोधन अध्ययनामध्ये गडचिरोली जिल्ह्यातील स्त्रियांच्या सक्षमीकरणाची गतिशीलता कश्याप्रकारे आहे ते जाणून घेण्याचा उद्देशाने प्रस्तुत संशोधन अध्ययनाची निवड केली आहे.

**संशोधनाचे उद्दिष्ट्ये :**

१. गडचिरोली जिल्ह्यातील स्त्रियांच्या सक्षमीकरणाचा अभ्यास करणे.

२. स्त्रियांच्या कुटुंबातील महत्वाच्या निर्णय प्रक्रियेतील सहभाग जाणून घेणे.

३. स्त्रियांचे आर्थिक, राजकीय आणि शैक्षणिक सक्षमीकरण जाणून घेणे.

**संशोधनाचे गृहीतकृत्ये :**

१. गडचिरोली जिल्ह्यामध्ये स्त्री सक्षमीकरणाची गती कमी आहे.

२. कुटुंबातील महत्वाच्या निर्णय प्रक्रियेत स्त्रियांचे प्रमाण निम्न आहे.

३. गडचिरोली जिल्ह्यामध्ये स्त्रिया अजूनही आर्थिक, राजकीय आणि शैक्षणिक दृष्ट्या सक्षम नाही.

**अध्ययन क्षेत्र आणि नमुना निवड :** प्रस्तुत अध्ययनात गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी तालुक्याची अध्ययन क्षेत्र म्हणून निवड करण्यात आली. आरमोरी तालुक्यातील शिवनी, पळसगाव, रामपूर, कासवी, अंतरजी आणि वघाळा या गावातील २० ते ५० वयोगटातील प्रत्येकी ५ असे एकूण ३० स्त्रियांची नमुना म्हणून निवड करण्यात आली.

**तथ्य संकलन आणि तथ्य प्रक्रीयन :** प्रस्तुत अध्ययनात मुलाखात-अनुसूची या तंत्रामार्फत प्राथमिक तथ्य संकलन आणि पुस्तके, इंटरनेट, मासिके या माध्यमातून द्वितीयक तथ्य संकलन करण्यात आले. तसेच तथ्यांचे वर्गीकरण, संकेतीकरण, सारणीकरण करून तथ्यांचे विश्लेषण करण्यात आले.

**'गडचिरोली जिल्ह्यातील ग्रामीण समाजातील महिला सक्षमीकरणाची एक सद्य:स्थिती**

प्रस्तुत शोधप्रकल्पात गडचिरोली जिल्ह्यातीलआरमोरी तालुक्यातील शिवनी, पळसगाव, रामपूर, कासवी, अंतरजी आणि वघाळा या गावातील ३० स्त्रियांची प्रत्यक्ष मुलाखत अनुसूचीच्या

माध्यमातून त्यांचेमुलाखती घेऊन माहिती संकलित करण्यात आली ही आकडेवारी खालील सारणीतून दिसून येते.

| प्रश्न क्र. | स्त्रियांचे मत | प्रतिसाद | | एकूण |
|---|---|---|---|---|
| | | होय | नाही | |
| १ | वैवाहिक स्थिती | ११(३६.६६%) | १९(६३.३४%) | ३०(१००%) |
| २ | शैक्षणिक स्थिती | २१(७०.००%) | ०९(३०.००%) | ३०(१००%) |
| ३ | स्त्रियांचे संतती संख्या ठरविण्याचा अधिकार आहे का ? | ०९(३०.००%) | २१(७०.००%) | ३०(१००%) |
| ४ | स्त्रियांचे कुटुंबातील निर्णय प्रक्रियेत स्त्रियांचे मत | १२(४०.००%) | १८(६०.००%) | ३०(१००%) |
| ५ | स्त्रियांना सांस्कृतिक कार्यक्रमात जाण्याची परवानगी | १०(३३.३३%) | २०(६६.६७%) | ३०(१००%) |
| ६ | मुलींना जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य आहे का? | १३(४३.३३%) | १७(५६.६७%) | ३०(१००%) |
| ७ | तुम्ही कोणत्या स्वयंसहाय्यता ग्रुप मध्ये सहभागी आहे का? | ०९(३०.००%) | २१(७०.००%) | ३०(१००%) |
| ८ | कुटुंबातील आर्थिक निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य आहे का? | ८(२६.६७%) | २२(७३.३३%) | ३०(१००%) |
| ९ | कुटुंबातमुलींना मुलांसारखे वागणूक आणि अधिकार | ०६(२०.००%) | २४(८०.००%) | ३०(१००%) |
| १० | मुलींना मुलांसारखे बाहेर शिक्षण आणि नोकरी चे स्वातंत्र्य | १०(३३.३३%) | २०(६६.६७%) | ३०(१००%) |
| ११ | आपल्या समाजात्त जन्माचा वेळी लिंग भेद पाळले जाते का? | २४(८०.००%) | ०६(२०.००%) | ३०(१००%) |
| १२ | स्त्रिया स्वतः च्या मर्जीने राजकीय निर्णय घेतात काय? | ५(१६.६७%) | २५(८३.३३%) | ३०(१००%) |
| १३ | कुटुंबाच्या वडिलोपार्जित संपत्तीमध्ये मुला-मुलीत समानता | ८(२६.६७%) | २२(७३.३३%) | ३०(१००%) |

वरील सारणीवरून असे लक्षात येते की, अध्ययनात नमुना म्हणून निवड केलेल्या स्त्रियांमध्ये ३६.६६ टक्के स्त्रिया विवाहित असून ६३.३४ टक्के स्त्रिया अविवाहित आहे. यापैकी ७०.०० टक्के स्त्रिया साक्षर असून ३०.०० टक्के स्त्रिया निरक्षर आहेत. समाजामध्ये ३०.०० टक्के स्त्रियांना संतती ठरविण्याचा अधिकार आहे तर ७०.०० टक्के स्त्रियांना अधिकार नाही.४०.०० टक्के स्त्रियांना कुटुंबातील निर्णय प्रक्रियेत स्त्रियांचे मत विचारले जाते तर ६०.०० टक्के स्त्रियांना विचारले जात नाही. ३३.३३ टक्के स्त्रियांना दंडार, नाटक, दुय्यम या सारख्या सांस्कृतिक कार्यक्रमात सहभागी होण्याचे स्वातंत्र्य असून ६६.६७ टक्के स्त्रियांना नाही.समाजातील ४३.३३ टक्के स्त्रियांना जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य आहे तर ५६.६७ टक्के नसल्याचे दिसून येते. समाजातील ७०.०० टक्के स्त्रिया बचत गट तसेच इतर स्वयं सहाय्यता गटामध्ये सहभागी असून ३०.०० टक्के सहभागी नाही. २६.६७ टक्के स्त्रियांना कुटुंबातील आर्थिक निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य असून ७३.३३ टक्के स्त्रियांना हे स्वातंत्र्य नाही. समाजात ८०.०० टक्के स्त्रियांना कुटुंबात मुलांसारखे समान वागणूक अधिकार मिळत नसल्याचे दिसून येते. ६६.६७ टक्के स्त्रियांना मुलींना मुलांसारखे बाहेर शिक्षण आणि नोकरी चे स्वातंत्र्य नाही. आजही समाजात लिंग भेद मोठ्या प्रमाणात पाळले जात असल्याचे दिसून येते. समाजातील फक्त १६.६७ टक्के स्त्रियां राजकीय निर्णय स्वतः घेत असल्याचे दिसून येते तर ८३.३३ टक्के स्त्रिया राजकीय निर्णय स्वतः घेत नाही. कुटुंबाच्या वडिलोपार्जित संपत्तीमध्ये मुला-मुलीत समानता आहे असे २६.६७ टक्के स्त्रियांना वाटते तर ७३.३३ टक्के स्त्रियांना असे वाटत नाही.

**गृहीतकृत्याची पडताळणी :** शोधप्रकल्पाचा सुरवातीला संशोधनकर्त्याने काही गृहीतकृत्याची मांडणी केली होती. त्या गृहीतकृत्याची संख्यात्मक तथ्याचा आधारावर सत्य-असत्याची पडताडणी संशोधनाचा अंती केली असल्यास सर्वच गृहीतकृत्य बहुतांश प्रमाणात सत्य ठरल्याचे दिसून येते.

**निष्कर्ष :** समाजामध्ये अजूनही स्त्रियांना संतती संख्या ठरविण्याचा अधिकार नसल्याचे दिसून येते. यावरून लक्षात येते की स्वतःच्या गर्भातून किती अपत्यांना जन्म द्यावा हे सुद्धा ती ठरवू

शकत नाही. समाजामध्ये कुटुंबातील एक सदस्य म्हणून स्त्रियांचे कुटुंबातील निर्णय प्रक्रियेत स्त्रियांचे मत विचारले जात नसल्याचे दिसून येते.समाजातील सांस्कृतिक कार्यक्रमात जाण्याची परवानगी स्त्रियांना नसल्याचे दिसून येते. कुटुंबात स्त्रियांना स्वतःचा जोडीदार निवडण्याचे देखील स्वातंत्र्य नसल्याचे दिसू येते. आज समाजामध्ये स्त्रिया अनेक स्वयं सहाय्यता गटामध्ये सहभागी असल्याचे दिसून येते. यात बचत गटाची संख्या जास्त असल्याचे दिसून येते. आजही स्त्रियांना कुटुंबातील आर्थिक निर्णय घेऊ दिल्या जात नाही. आज २१ व्या शतकात मानव नवनवीन वैज्ञानिक शोध लावून प्रगतीच्या शिकरावर पोहचत असला तरी मानवाला स्त्री-पुरुष समानतेचा प्रश्न सोडविता आला नसल्याचे दिसून येते, कारण समाजात, कुटुंबात स्त्रियांना पुरुषांच्या तुलनेत दुय्यम अधिकार देण्यात आले आहे, मुलगा हा वंशाचा दिवा, म्हातारपणाची काठी समजल्या जात असल्यामुळे समाजात मुलाच्या जन्माला विशेष महत्व दिले जाते तर मुलगी ही पराया धन समजून तिच्या जन्माला मात्र मुलासारखे महत्व दिले जात नाही. समाजात आजही मुलींना मुलांसारखे बाहेर शिक्षण आणि नोकरी चे स्वातंत्र्य नसल्याचे दिसून येते. समाजात आजही लिंगभेद मोठ्या प्रमाणात पाळले जात असल्याचे दिसून येते. आज स्थानिक स्वराज्य संस्थेत स्त्रियांना ५० टक्के आरक्षण मिळाले आहे त्यामुळे राजकीय क्षेत्रात स्त्रियांचे प्रमाण मोठ्याप्रमाणात वाढत आहे. या आरक्षणामुळे ग्रामीण समाजात स्त्रिया ग्राम पंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद यामध्ये निवडून येतात परंतु पुरुषकेंद्रित राजकारण, निरक्षरता, घरातील व्याप, चारित्र्यहननतेची समस्या इ. कारणामुळे त्या आपल्या अधिकाराचा वापर स्वतः करू शकत नाही तर कुटुंबातील पुरुष वर्ग जसे - पती, वडील सासरे, भाऊ हे पडद्याचा मागूनस्त्रियांच्या अधिकारांच्या वापर करीत असतात. कायद्यानुसार वडिलोपार्जित संपत्तीत मुला-मुलींच्या समान वाटा आहे परंतु तो अधिकार मुलींना मिळत नसल्याचे दिसून येते.

**उपाययोजना :**

I. स्त्रियांना आपल्या अधिकारांप्रती जागृत करणे गरजेचे आहे. केवळ कायदे करून महिला सक्षमीकरण वर्ष घोषित करून महिला सक्षम होणार नाही.स्त्रियांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी स्त्री सक्षमीकरण चळवळ उभी केली पाहिजे.

II. समाजातील, कुटुंबातील स्त्री-पुरुष असमानता नष्ट केली पाहिजे. यासाठी ग्रामीण क्षेत्रात लोकांमध्ये जाणीव-जागृती करून समाजाचे प्रबोधन करणे आवश्यक आहे. आज लहानापासून ते वृद्धापर्यंत कोणतीच स्त्री सुरक्षित नाही म्हणून आज महिलांना सुरक्षा प्रदान करणे आवश्यक आहे, तरच स्त्री अर्थार्जनासाठी घराच्या चौकटीचा बाहेर पडतील.

III. कुटुंबातील पुरुषप्रधान वर्चस्वावर बदल करणे आवश्यक आहे. त्याशिवाय स्त्रिया समाजात निर्भीडपणे वावरू शकणार नाही.

IV. स्त्रियांना विविध प्रकारचे व्यावसायिक प्रशिक्षण देऊन त्यांना स्वयंरोजगार उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. तसेच समाजकारण, राजकारण, अर्थकारण, शिक्षण, इ. क्षेत्रात महिला अग्रेसर असले तरी याचे प्रमाण वाढवणे आवश्यक आहे.

V. स्त्रियांमध्ये असलेले धार्मिक आणि पारंपारिक रीतीरिवाज, रूढी, परंपरा यांचे वलय नष्ट करणे गरजेचे आहे. तरच स्त्री आकाशात उंच भरारी घेण्यास सक्षम होतील.

भारतातील पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये अनेक वर्षापासून कुटुंबात जखडलेल्या स्त्रीया आज अन्याय, अत्याचाराच्या गर्तेतून बाहेर पडत असल्याचे दिसून येत असले तरी ग्रामीण भागातील

स्त्रियांमध्ये मात्र समाज परिवर्तनाची गती कमी असल्याचे दिसून येते. संशोधनातील वरील उपाययोजना केल्यास साहजिकच स्त्रीसक्षमीकरणाची चळवळ यशस्वी होईल.

## Reference

E.Chandran (1997) Social and Economics Problem of India,Cosmos Book L.T.D. New Delhi.

Singh K. 'Religion and society ' Shahu Publisher Center Kanpur.

Bharati Ray (2005)Women of India :Colonial and Post-colonial Periods : Bharati Ray, Sage Publications.

Neera Desai, Usha Thakkar (2001)Women in Indian society:, National Book Trust, India.

Andal Narayanan (2002) Women and Indian Society : Options and Constraints : Rawat Publications.